तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी — २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स — २२६९२१०२.
E-mail : desk10@dte org.in Internet : www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/अल्कहोल/२०१४/ 2030
दिनांक : - 2 दिसम्बर DEC 2014

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

विषय : औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांना अल्कहोल/स्पिरीट इ. वापरण्यास परवानगी देणेबाबत...

उपरोक्त विषयाबाबत असे कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमार्फत डयुटी फ्री अल्कोहोल व स्पिरीट मिळण्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्याबाबतचे प्रस्ताव या संचालनालयास प्राप्त झालेले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, प्रत्येक महाविद्यालयाची रसायनाची लागणारी गरज संबंधीत विद्यापीठाचे/ मंडळाचे अभ्यासक्रम, तुकडींची संख्या व विद्यार्थी संख्या यावर अवलंबून असल्यामुळे याबाबत एक सार्वभौमिक नियम नाहीत. सदर रसायनांच्या वापराकरीता परवाने घेणे, खरेदी, ठेवणे, वापरणे व त्यांच्या अभिलेखाचे जतन करण्याची जबाबदारी संबंधीत संस्था/महाविद्यालयाच्या संस्थाप्रमुखांची आहे. याबाबत परवान घेण्याकरीता या संचालनालयाची मंजूरीची आवश्यकता नाही.

तरी, प्रत्येक संस्थाप्रमुखांनी अल्कोहोल, मिथीनऑल असेटीक अनहाड्राइड, सायनाइडस्, फॉसजीन व इतर विषारी पदार्थ, ज्वलनशिल विलायक, संपीडीत गॅसेस करीता केंद्र व राज्य शासनाचे नियम व आदेशानूसार त्यांच्या स्थरावर परवानगी संबंधित विभागाकडून घ्यावी ही बाब आपल्या अधिपत्याखालील औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत :१. प्राचार्य, औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सर्व संस्था (संबंधीत विभागीय कार्यालयांमार्फत)
२. कार्यासन क्रमांक २, मुख्य कार्यालय, मुंबई.
३. प्रणाली व्यवस्थापक, आयटी सेल, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
४. निवडनस्ती.

\\DTENS1\desk10\DINESH\Takrar forwording letters 2013-15.doc